दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३४ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२१ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# कंत्राटी भरतीचा जीआर रद्द करणार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा



**मुंबई : शिक्षकांच्या कंत्राटी भरतीवरून राज्यभरात गदारोळ झाल्यानंतर आता अखेर राज्य सरकारने एक पाऊल मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. कंत्राटी भरतीचा जीआर आम्ही रद्द करणार असल्याची घोषणा भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. 'आधीच्या सरकारांनी केलेले पाप आपल्या माथी नको, अशी भूमिका मांडत मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केली असून कंत्राटी भरतीचा जीआर आम्ही रद्द करणार आहोत,' अशी माहिती फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.'**

## पवार-ठाकरेंवर गंभीर आरोप

कंत्राटी भरतीवरून युवकांच्या मनात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र या भरतीला सुरुवात काँग्रेस-राष्ट्रवादीनेच केली होती. २००३ साली काँग्रेस-राष्ट्रवादीचं सरकार असताना शिक्षण विभागात कंत्राटी भरती करण्यात आली. त्यानंतर २०१० साली अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना दोनदा कंत्राटी भरती काढण्यात आली. २०११ साली पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री असताना कंत्राटी भरतीचा जीआर काढण्यात आला. २०१३ सालीही अशीच भरती काढण्यात आली. उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना शरद पवार यांच्या आशीर्वादाने त्यांनीही कंत्राटी भरतीची निविदा काढली होती. मात्र हे लोक स्वत:चं पाप आमच्या माथी फोडण्याचा प्रयत्न करत होते. त्यामुळे आता आम्ही अशी भरती रद्द करण्याचा निर्णय घेत आहोत,' असा हल्लाबोल देवेंद्र फडणवीसांनी केला.दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या या गंभीर आरोपांना आता महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून कसं प्रत्युत्तर दिलं जातं, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### लखबिर सिंग लक्खा यांच्या भक्तीगीतात चंद्रपूरकर तल्लीन

## नवरात्री दरम्यान जन्मलेल्या कन्यांना महोत्सव समितीच्या वतीने देण्यात आले चांदीचे नाणे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने आयोजित श्री माता महाकाली महोत्सवात जगप्रसिद्ध देवी गीत जागरणकार लखबिर सिंग लक्खा यांच्या भक्तिमय गीतांनी रंगत भरली. यावेळी लखबिर सिंग लक्खा यांनी गायलेल्या भक्तीगीतात चंद्रपूर तल्लीन झाला.

काल गुरुवारी महाराष्ट्राचे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या हस्ते महाकाली महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमानंतर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी चंद्रपूरकरांनी अनुभवली यावेळी सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणा-यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर चंद्रपूरातील स्थानिक कलाकारांनी व शालेय विद्यार्थ्यांनी नृत्य जल्लोष हा कार्यक्रम सादर केला. तर सायंकाळी ९ वाजता कार्यक्रमाचे विशेष आकर्षण असलेल्या जगप्रसिद्ध देवी गीत जागरणाकर लखबिर सिंग लक्खा यांचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी माता भक्त हजारोच्या संख्येने महोत्सव स्थळी जमा झाले होते. यावेळी आमदार किशोर



जोरगेवार, कल्यानी किशोर जोरगेवार, महाकाली माता महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, कोषाध्यक्ष पवण सराफ, सदस्य बलराम डोडाणी, कुक्कु सहाणी, मिलींद गंपावार, संजय हरणे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी लखबिर सिंग लक्खा यांना मातेची चुनरी, मातेची मुर्ती आणि शाल श्रीफळ देत त्यांचे स्वागत केले. आमच्या विनंतीला मान देत आपण येथे आलात. या महोत्सवात रंगत भरली असे यावेळी आमदार जोरगेवार म्हणाले. आये नौरात्रे माता के या भक्तीगीताने लखबिर सिंग लक्खा यांनी कार्यक्रमाला सुरुवात करताच संपूर्ण परिसरात भक्तीचा महासागर अवतरला.तर माता महाकालीच्या आरती आणि भजनाने महाकाली महोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाची सुरवात करण्यात आली यावेळी ११ वाजता भावना तन्नीरवार यांचा प्रवचन कार्यक्रम पार पडला, त्यानंतर नवरात्री दरम्यान जन्मलेल्या कन्यांच्या पालकांना श्री महाकाली माता महोत्सव समीतीच्या वतीने चांदिचे नाणे देण्यात आले. नंतर कवी सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच दिवसभर विविध कार्यक्रम घेण्यात आले.

## उपजिल्हा रुग्णालय वरोरा येथे जागतिक रजोनिवृत्ती दिन कार्यक्रम संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा उपजिल्हा रुग्णालयात जागतिक रजोनिवृत्ती दिनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.हा कार्यक्रम महिनाभर वेगवेगळ्या प्रकारच्या उपक्रमांतून घेता येतो.नवरात्रीचे दिवस चालू आहे.नवरात्र हे शक्तीचे प्रतीक आहे.त्याच शक्तीचा आदर्श घेऊन नवरात्रोत्सवचे औचित्य साधून हा रजोनिवृत्ती दिनाचा कार्यक्रम खास महिलांसाठी जनजागृतीपर प्रचार व प्रसार करण्याचे उद्देशाने आयोजित करण्यात आला होता.



हा कार्यक्रम डॉ प्रफुल्ल खूजे वैद्यकीय अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली वंदना विनोद बरडे सह.अधीसेविका उपजिल्हा रुग्णालय वरोरा जिल्हा चंद्रपूर यांनी आयोजित केला होता.या कार्यक्रमाला डॉ सुषमा लांबट स्त्रीरोग तज्ज्ञ,वंदना विनोद बरडे सह. अधीसेविका,,गीतांजली ढोक आहारतज्ज्ञ, डॉ.वर्षा भुसे फिजिओथेरपिस्ट, नेहा ईंदुरकर समुपदेशक उपस्थित होत्या या सर्व तज्ञ महिलांनी आपआपल्या क्षेत्रातील विषयांवर मार्गदर्शन केले.हा कार्यक्रम स्त्रियांनी स्त्रियांसाठी आयोजित केला होता.रजोनिवृत्ती दिनाचा संदर्भात मार्गदर्शन करुन प्रचार व प्रसार करण्याचे आवाहन करण्यात आले होते.डॉ लांबट स्त्रीरोग तज्ज्ञ यांनी रजोनिवृत्तीचि माहिती, लक्षणें, उपाय, विषयी मार्गदर्शन केले. वंदना विनोद बरडे अधीसेविका यांनी रजोनिवृत्ती मध्ये कुटुंबातील व्यक्तींचा सहभाग आणि सासू सुनेतील संबंध यांचे महत्त्व समजावून सांगितले त्याचा परिणाम चांगला कसा होतो आणि जीवन कस खूशयाली सुखदायी होतों याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले गीतांजली ढोक आहारतज्ज्ञ यांनी आहाराविषयी मार्गदर्शन केले.कोण कोणता आहार घ्यायला पाहिजे.काय खबरदारी घ्यायला पाहिजे याचे मार्गदर्शन केले.डॉ वर्षा भुसे फिजिओथेरपिस्ट यांनी रजोनिवृत्ती मध्ये कोणकोण व्यायाम, प्राणायाम करायला पाहिजे.याविषयी सविस्तर माहिती दिली.नेहा ईंदुरकर समुपदेशक यांनी रजोनिवृत्ती मध्ये आपले मानसिक स्वास्थ्य कसे ठेवायचे याचे मार्गदर्शन केले.सूत्रसंचालन स्नेहा रामटेके यांनी केले प्रास्ताविक स्वाती जूणारकर व आभारप्रदर्शन सोनाली राईसपायले यांनी केले.या कार्यक्रमाला सरस्वती कापटे परिसेविका जोशीला गेडाम यांनी सहकार्य केले.स्त्री शक्तीला सलाम करूंन तिसऱ्या ईनींगचे स्वागत करून पॉझीटीव्ह विचार शैली आत्मसात करून पुढील आरोग्यदायी जीवनाची सकारात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा देवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मागासवर्गीयांसाठी असलेली मार्गदर्शिका विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा-डॉ.प्रशांत बोकारे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाने मागासवर्गीयांसाठी असलेली मार्गदर्शिका प्रकाशित केली.विद्यार्थ्यांना शासकीय योजना विषयी कुठलीही शैक्षणिक समस्या असेल तर त्याच उत्तर ही मार्गदर्शिका आहे. या मार्गदर्शिकेत विद्यापीठाच्या समितीचे मोठे योगदान आहे.विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांनी या मार्गदर्शिके साठी पुढाकार घेतला. यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो.मागासवर्गीयांसाठी असलेली ही मार्गदर्शिका विद्यार्थ्यांसाठी अमूल्य ठेवा आहे असा विश्वास कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला. चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्यात काल गोंडवाना विद्यापीठाची मागासवर्गीयांसाठी उपयोगी असलेली मार्गदर्शिका लोकार्पित तसेच वितरित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. त्यावेळी ते बोलत





होते.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व उद्घाटक म्हणून सामाजिक न्याय व सक्षमीकरण विभागाचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले, तर मुख्य अतिथी म्हणून राज्याचे वने व सांस्कृतिकमंत्री सुधीर मुनगंटीवार , आमदार सुभाष धोटे, आमदार प्रतिभा धानोरकर , आमदार सुधाकर अडबाले. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे तसेच कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान डॉ. अनिल चिताडे आदी उपस्थित होते.चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर काल झालेल्या धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्यात गोंडवाना विद्यापीठाची मागासवर्गीयांसाठी उपयोगी असलेली मार्गदर्शिका उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकार्पित करण्यात आली .यावेळी विद्यार्थ्यांचा प्रचंड उत्साह होता. ही मार्गदर्शिका घेण्यासाठी नागरिकांनी गोंडवाना विद्यापीठाच्या स्टॉल वर गर्दी केली होती.या मार्गदर्शिकेत मागासवर्गीयांसाठीच्या सर्व शासकीय योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण केंद्र, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विविध शिष्यवृत्ती व फेलोशिप, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी सुवर्णपदके पारितोषिक, महाराष्ट्र ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची उद्दिष्टे व कार्ये,गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यृत्ती मंजूर करण्याबाबत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, सर्व शासकीय मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी असलेल्या आरक्षणात सुधारणा करण्याबाबत, अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याबाबत इत्यंभूत माहिती आहे.मार्गदर्शिकेच हे पहिलेच वर्ष आहे.

## अजय कंकडालवार यांच्या हस्ते सुगमसंगीत कार्यक्रमाचे उदघाटन



**अहेरी । प्रतिनिधी**

येथील दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा दुर्गा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.अहेरी येथील आदर्श दुर्गात्सव मंडळ तर्फे सुगम संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले असता सदर सुगम संगीत कार्यक्रमाला आविसं अजय मित्र परिवारचे विदर्भ नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांनी दुर्गा मंडळला भेट देऊन दुर्गा देवीचे विधिवत पूजा अर्चना करून सुगम संगीत कार्यक्रमाचे उदघाटन केले.

यावेळी अहेरी नगरपंचायतचे उपाध्यक्ष शैलेश पटवर्धन,नगरसेवक प्रशांत गोडशेलवार,माजी जिल्हा परिषद सदस्य अजय नैताम,नरेंद्र गर्गम, कुमार गुरनुले,अजय सडमेक,महेश गेडाम,राकेश सडमेक,प्रमोद गोडशेलवारसह आदर्श दुर्गोत्सव मंडळाचे पदाधिकारी व सदस्यगण तसेच आविसं अजय मित्र परिवाराचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# खा.अशोक नेते यांनी हत्तीच्या हल्ल्यात ठार झालेल्या इसमाच्या कुटुंबियांचे केले सांत्वन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

जिल्ह्यात धुमाकूळ घालत असलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने तीन आठवड्यात दुसरा बळी घेतला आहे. गडचिरोली शहरापासून अवघ्या ६ ते ७ किलोमीटर अंतरावर असलेल्या दिभना गावातील शेतात घुसलेल्या हत्तींना हुसकावण्याचा प्रयत्न काही शेतकरी करत होते. या गडबडीत चवताळलेला एक हत्ती मागे लागला. त्यामुळे पळण्याच्या प्रयत्नात होमाजी बाबाजी गुरनुले हे खाली पडले आणि हत्तीने त्यांना सोंडेने उचलून चिरडले. ही घटना. १७ ऑक्टोबरला रात्री ८:३० वाजताच्या सुमारास घडली.

या घटनेची माहिती खासदार अशोक नेते यांना कळताच त्यांनी दिभना येथे गुरनुले यांच्या घरी जाऊन त्यांच्या वृद्ध वडीलांची सांत्वना केली. वनविभागाच्या वतीने तातडीची मदत म्हणून ५० हजार रुपये आणि खासदार अशोक नेते यांनी आपल्या वतीने काही आर्थिक मदत त्यांना दिली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी राकेश मडावी, वनरक्षक शिवनकर, वनरक्षक काकेवार, वनरक्षक फोकळी वनरक्षक सयाम, वनिता जैगठे, विलास जेंगठे, सुभाष गुरनुले, अशोक जंगठे, बुधाजी मोहूरले, तसेच गुरनुले यांचे अनेक नातेवाईक आणि गावकरी उपस्थित होते. शेतात पाणी करण्यासाठी व इतर शेतातील कामे करण्यासाठी अनेक शेतकरी बांधव सकाळच्या व सायंकाळच्या सुमारात शेतात काम करण्याकरिता जावे लागते. मात्र या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्यामुळे खासदार अशोक नेते यांनी यावेळी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना लवकरात लवकर हतीच्या कळपाचा बंदोबस्त करा हाकलून लावा, अशा सूचना वनविभागाच्या अधिकाऱ्यांना खासदार अशोक नेते यांनी दिल्या.



# गुटखाबंदी नावापुरतीच!

**तंबाखूजन्य पदार्थ खाणे आरोग्यासाठी घातक आहे हे माहिती असूनही केवळ प्रसिद्धी माध्यमात येणाऱ्या जाहिरातींमुळे प्रभावित होऊन व बाजारात सहज उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी गुटखा व तत्सम तंबाखूजन्य वस्तूंच्या वापराकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित व अधीन होत आहे. शासनाने वेळीच हस्तक्षेप करून व प्रशासनाने प्रामाणिक जबाबदारी सांभाळत यावर नियंत्रण ठेवल्यास गुटखा हद्दपार होईल. या व्यसनाच्या आहारी अधीन होणारी तरुणाई वाचविणे हे सर्वांचेच आपले नैतिक कर्तव्ये आहे.**



जे वाचले ते
डॉ.यशवंत घुमे
९८२२२३३९१२

महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक आरोग्य सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने व जनहित लक्षात घेत गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधी सुपारी व इतर तत्सम पदार्थावर २०१२ पासून अन्नसुरक्षा कायद्याचे तरतुदींच्या अधीन राहून बंदी घातली गेली आहे. गुटख्याच्या सेवनामुळे केवळ तोंडाचाच कर्करोग होतो असे नाही तर तोंडाच्या विकासाशी देखील गुटखा सेवनाचा संबंध जोडला गेला आहे. गुटखा खाणाऱ्यांचे नैसर्गिकपणे तोंड उघडत नाही. जो एक पूर्वरूप कर्करोगजन्य जखम आहे. त्याचे घातक परिणाम लक्षात घेऊन गुटखा आणि पानमसाला यांची विक्री करण्यावर महाराष्ट्रात बंदी आहे. गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांमध्ये असलेल्या मॅग्नेशियम कार्बोनेटसारख्या घातक घटकांमुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचा नागरिकांना सामना करावा लागतो त्यामुळे आरोग्य धोक्यात येते. गुटख्याला पर्याय म्हणून मावा खाल्ला जातो. माव्यात तंबाखूचा वापर होत असल्याने तो तयार करणे आणि त्याची विक्री करणे बेकायदा आहे. याकडे दुर्लक्ष करून पान टपऱ्यांमध्ये मावा वेगवेगळ्या रूपात तयार करून विकला जातो. तरुणाईला माव्याचे व्यसन जडल्याने पान टपऱ्यांवर शौकीनांची नेहमीच वर्दळ असते. गुटखा निर्मिती करणारे कारखाने हे महाराष्ट्राच्या बाहेर मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्राच्या बाहेरून विविध चेक पोस्ट पार करून हा गुटखा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचेपर्यंत अनेकांचे हात ओले करतो. यामध्ये अन्न औषध प्रशासन, पोलीस, परिवहन विभाग या सर्व यंत्रणा हाताशी घेतल्या जातात असे ऐकिवात आहे. या सर्व अधिकाऱ्यांच्या संगनमताने करोडो रुपयांचा व्यवसाय राजरोसपणे चालतो. प्रशासन नाममात्र केवळ कागदोपत्री किरकोळ कारवाया दाखवत मोठ्या धनदांडग्या विक्रेत्यांना सवलत देत असते. अन्न आणि औषधी प्रशासन आणि पोलीस विभाग या दोघांकडे अनेकदा तक्रार देऊनही त्यावर कारवाई होत नाही. उलट तक्रारी करणाऱ्यांची माहिती गुन्हेगारांना दिली जाते असा आरोप ऐकायला मिळतो. तो खरा असेल तर ही चिंताजनक बाब आहे. एका तज्ज्ञांशी केलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात जवळपास अडीच कोटी लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारे तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करत असतात. त्यात २ कोटी लोक तोंडावाटे तंबाखू सेवन करणारे तर ४० लाख धूम्रपान करणारे आहेत. जवळपास ७०% नागरिकांना तोंडाच्या आजाराबद्दल काहीही माहीतच नसते.केवळ संगत व गंमत म्हणून सुरू केलेला छंद सवयीमध्ये बदलतो. यातूनच




तोंडाचा कर्करोग होतो. त्यामुळे बऱ्याचदा रुग्णाच्या तोंडाची शस्त्रक्रिया करावी लागते.

आरोग्याचा सत्यानाश करतो. जेव्हा माहिती मिळते तेव्हा वेळ निघून गेलेली असते व संबंधिताला, त्याच्या परीवाराला अप्रिय घटनांना सामोरे जावे लागते. तंबाखूजन्य आरोग्य घातक पदार्थांची विक्री होऊ द्यायची नसेल तर ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात गुटखा विक्री होताना आढळेल त्या विभागातील पोलिस अधिकारी व अन्न प्रशासन विभागाच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे.

पोलीस विभागाने जर मनात आणले तर नक्कीच शंभर टक्के अवैध व्यवसाय बंद होईल यात शंका नाही. परंतु कारवाई करणारे विभागच विक्री करणाऱ्यांशी गुप्तसंधान बांधून असल्यामुळे सरकारचा हेतू सफल होताना दिसत नाही. अधिकाऱ्यांच्या आर्थिक हव्यासापायी निर्दोष नागरिकांच्या आरोग्याशी खेळ मांडला जातो. शासनाने सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास सक्तबंदी केली पाहिजे. सिगरेटच्या किंवा इतर तंबाखूजन्य उत्पादनांच्या जाहिरातीवर प्रतिबंध केला पाहिजे. प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रसिद्धी माध्यमे सामान्य नागरिकांच्या मनावर प्रभाव टाकत असतात. म्हणून प्रसिद्धी माध्यमांनीही आपली नैतिक जबाबदारी सांभाळून कुठल्या गोष्टीचा प्रचार करावा आणि कुठल्या गोष्टीचा प्रचार करू नये हे ठरवले पाहिजे. आजची युवा पिढी ज्या सेलिब्रिटींना आपला आदर्श मानते अशा सेलिब्रिटीच जर असल्या फालतू व्यवसायाची जाहिरात करत असेल तर हे नैसर्गिक नाही.१८ वर्षाच्या कमी वयाच्या व्यक्तीस आणि शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कठोर निर्बंध लादले पाहिजे. ज्या कारखान्यात अशी घातक उत्पादने निर्माण केली जातात अशा कारखान्यांवर कायमची बंदी करायला पाहिजे. कारखान्यातूनच जर अशा घातक मालाची निर्मिती झाली नाही तर तो नागरिकांच्या हातात लागणारच नाही. परंतु शासन चोर सोडून संन्याशाला फाशी द्यावी त्याप्रमाणे किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई करते आणि माल उत्पादकांना मात्र अभय देते हे दोगलेपण थांबायला पाहिजे. शासनाने लोककल्याणकारी भूमिका घेऊन आपले कर्तव्ये निभावले पाहिजे. केवळ भरपूर राजस्व मिळतो म्हणून कुठल्याही घातक वस्तूंची विक्री आणि प्रसिद्धी करायला परवानगी देताना दहा वेळा विचार करूनच ती दिली पाहिजे. आणि लोक जागृती ही महत्वाची आहे लोकांमध्ये जर चांगले आणि वाईट हे समजून घेण्याची वृत्ती तयार झाली तर अशा वस्तू डोळ्याने दिसल्यावरही त्या घेण्याची इच्छा होणार नाही.मनावर नियंत्रण महत्वाचे आहे.

# स्थित्यंतरातील वाहने नि आव्हाने

हळूहळू पण निश्चितपणे जग बॅटरीवर चालणारी वाहने वापरू लागले आहे. जगभरात सर्व वाहनकंपन्या आपापले पेट्रोल- डिझेल इंजिनकडून विजेवर चालणाऱ्या इंजिनचे नियोजन जाहीर करत आहेत. भारतही या बदलामध्ये मागे नाही. सर्व मोठ्या भारतीय कंपन्या आपल्या विजेवरील चारचाक्या आणि दुचाकी वाहने उत्पादन करू लागल्या आहेत.एवढेच नव्हे तर भारतीय ग्राहकांमध्ये ही वाहने लोकप्रियही आहेत. कदाचित पेट्रोलच्या वाढत्या किमतींमुळे की काय; पण भारतात वाहनक्षेत्रातील 'हरितक्रांती'चे मुख्य कारण ग्राहकांकडून असलेला उत्तम प्रतिसाद असल्याचे मानले जाते.२०२२-२३ मध्ये या विजेवरच्या गाड्यांचे उत्पादन मागील वर्षीपेक्षा १५५ टक्क्यांनी वाढून १७ लाख झाले आहे. भारतीय वाहनउद्योग २०३० पर्यंत विषारी वायूउत्सर्जन ४५ टक्क्यांनी कमी करण्याच्या ध्येयाकडे आगेकूच करत असतानाच या बदलामुळे झलेल्या तंत्रज्ञानविकासाचा परिणाम वाहन दुरुस्तीक्षेत्रातल्या अनेक लघु उद्योग आणि सूक्ष्म सेवांवर होणार आहे.सध्या वाहनउद्योगाशी संबंधित नानाविध उद्योग लघु-सूक्ष्म उद्योगक्षेत्रात रोजगार निर्माण करत आहेत. पुण्याच्या आजूबाजूला गाडीतील प्रत्येक भाग तयार करून बजाज, टेल्को इत्यादी मोठ्या कंपन्यांना पुरवणारी हजारो लघु- सूक्ष्म उद्योगांची पुरवठासाखळी आहे.भारतात या क्षेत्रात परदेशी गुंतवणूक येत आहे; परंतु सध्यातरी विजेच्या गाड्यांसाठी लागणारे बहुतेक भाग हे व्हिएतनाम, चीन, जर्मनी



इत्यादी देशांमधून आयात केले जातात. लौकरच या आयातीची जागा भारतात परदेशी गुंतवणुकीच्या साहाय्याने बनवलेली उत्पादने घेतील.जसजशी परंपरागत वाहनांची जागा विजेवर चालणारी वाहने घेऊ लागतील, तसतशी वाहनउद्योगावर आधारित जुन्या भागांची आणि ते बनवणाऱ्या लघुउद्योगांसाठीची मागणी कमी होऊ लागेल. या परिस्थितीला या लघु उद्योगांनी कसे सामोरे जावे, याचे ठोस नियोजन कोणत्याही प्रकारे झाल्याचे दिसत नाही.सेवाक्षेत्रात गाडीमध्ये हवा भरण्यापासून, तेल पाणी करणे, इंजिनाचे विविध भाग पुरवणे या व्यवसायांमधील गॅरेज मेकॅनिक आहेत. त्यांच्या सेवांसाठीची मागणीदेखील कमी होऊ लागेल. एकदा मॅकेनिकाकडे गेल्यावर गिअर बॉक्समधले तेल बदलणे, आरसा घट्ट करणे, ब्रेककेबल बदलणे अशा प्रकारची विविध कामे निघून मॅकेनिक रोजगार मिळवत असे.आता नवीन वाहनांमध्ये तेल बदलणे, यासारखी कामे निघणारच नाहीत. एकीकडे जुन्या व्यवसायांवर गदा येण्याची भीती तर दुसरीकडे विजेच्या गाड्यांसाठी योग्य मॅकेनिक मिळणे दुरापस्त अशी परिस्थिती सध्या अमेरिका-ब्रिटनसारख्या काही पाश्चात्य देशांमध्ये दिसते.या नवीन गाड्या दुरुस्त करण्यासाठी जी विशिष्ट साधने लागतात, त्यासाठी पैसे ओतणे या व्यावसायिकांना परवडत नाही. भारतातही 'बॅटरीवरच्या गाडीला हात लावणार नाही' असे सांगण्यात येते, त्यामुळे नवीन विजेवरची गाडी घेतली तर नेहमीच्या कोपऱ्यावरच्या जुन्या गॅरेजमध्ये सोडता येत नाही.सरकार या नव्या 'हरितक्रांती'वर भर देऊन विजेवरील वाहनांसाठी परदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन देत आहे. ग्राहकांनाही बऱ्याच राज्यांमध्ये विविध करांमधून सूट देण्यात आली आहे. परंतु विजेच्या गाड्या दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण दुर्मिळ आहे.कारण काही राज्यांत सरकारने दोन वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला आहे. या क्षेत्रात नव्याने येणाऱ्या तरुणांसाठी तो उपयोगी पडेल. पण जे लाखो लोक परंपरागत वाहनदुरुस्ती करताहेत त्यांच्या भवितव्याचे काय?देश प्रगतिपथावर असताना स्थित्यंतरे अटळ असतात; पण त्यातून आर्थिक विषमता तीव्र होऊ न देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत. लघु- सूक्ष्म उद्योग व गॅरेज व्यावसायिक यांनी या स्थित्यंतराला सामोरे जाण्यासाठी काय करावे. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण त्यांना दिल्यास मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीत भर पडण्यापासून देश वाचू शकेल..

# सांगोल्यातील क्रीडा संकुल तसं चांगल पण संविधांअभावी नागरिक, खेळाडूंमध्ये नाराजी

**सांगोला –** सांगोला शहरातील मध्यभागी असलेल्या क्रीडा संकुलनामध्ये विद्यार्थी, पोलीस, मिलिटरीमध्ये भरतीसाठी प्रयत्न करणारे तसेच व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या नेहमीच मोठ्या प्रमाणावर असते. या क्रीडा संकुलनाचा वापर चांगला होत असला तरी स्वच्छतेबाबतीत व सुविधांअभावी नागरिकांमधून नाराजी व्यक्त हेत आहे.सध्याच्या धावत्या युगामध्ये सर्वच वयोगटातील तरुण, वयोवृद्ध नागरिकांना आपल्या शरीराचा काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. खाण्याबरोबरच नियमित व्यायाम करण्याकडे सर्वांचाच कल वाढला आहे. व्यायामासाठी विशेषतः वयोवृद्धांना सकाळ - संध्याकाळ चालण्यासाठी सांगोल्यातील क्रीडा संकुलनाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.रस्त्यांवर अपघात वाढल्याने अनेक नागरिक चालण्यासाठी सध्या शहराच्या मध्यभागी असलेल्या या क्रीडा संकुलनाचाच वापर करीत असतात. पोलीस मिलिटरी व एमपीएससीद्वारे परीक्षा देणारे अनेक विद्यार्थी या मैदानात व्यायामासाठी, खेळण्यासाठी येत असतात. या क्रीडा संकुलनामध्ये चालण्याच्या ट्रॅकबरोबरच बास्केटबॉलचे



मैदान असले तरी या बास्केटबॉलसाठी स्टॅन्ड उपलब्ध नसल्यामुळे त्या मैदानाचा असूनही काही उपयोग होत नाही. मैदानावर अनेक ठिकाणी गवत व इतर छोटी मोठी झुडपे वाढलेले दिसून येतात. या क्रीडा संकुलनाच्या मध्ये हायमास्ट दिवा असला तरी अनेक वेळा तो बंदच असल्याने पहाटेच्या वेळी व्यायाम करणे व चालणे या मैदानावर कठीण होत असते.बास्केटबॉलची मैदाने शक्यतो दक्षिण - उत्तर दिशेस असतात. परंतु सांगोल्यातील क्रीडा संकुलनातील बास्केटबॉल मैदान हे पूर्व – पश्चिम असल्याचे दिसून येते. सध्या इथे फक्त सिमेंटचे मैदान शिल्लक असून इतर काहीही साहित्य उपलब्ध नसल्याने बास्केटबॉल प्रेमी नाराजी व्यक्त करतात. अशा खेळ प्रकारात मैदानासाठी आलेला निधीचे होते तरी काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे. मैदानेच चुकीची तयार होत असतील तर खेळ कसा सुधरेल असा प्रश्न क्रीडाप्रेमी उपस्थित करीत आहेत.

**मैदानावरील गवत व झाडे, झुडपे काढण्यात यावीत**

– बास्केटबॉल मैदानामध्ये बास्केटस्टॅन्डची उभारणी करावी
– मैदाना शेजारीच मुलींना व महिलांसाठी स्वच्छतागृह असावे
– लांब उडीसाठी मऊ मातीची किंवा वाळूची व्यवस्था करावी
– सायंकाळी हायमास्ट दिवे नियमित लावावीत
– मैदानावर येणाऱ्या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा
– खुल्या मैदानावर व्यामासाठीचे साहित्य उपलब्ध करुन द्यावीत.

क्रीडा संकुलनासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर केला गेला पाहिजे. क्रीडा मैदानेच सुसज्य नसतील तर सदृढ भारत बनेल तरी कसा ? यावर होणाऱ्या निधीचा भ्रष्टाचारमुक्त वापर करून यासाठी सक्षम क्रीडा अधिकारी नेमला पाहिजे – आनंदा माने, माजी नगरसेवक, सांगोला.क्रीडा संकुलनाच्या बाबतीत ज्या काही असुविधा नागरिकांना सतावत आहेत अशा दुरुस्त करण्यासाठी निश्चितपणे सुधारणा करेन. स्वच्छतागृह व इतर संकुलनामधील सुधारणाकामी नव्याने प्रस्ताव पाठवण्यात येतील – सुप्रिया गाढवे, तालुका क्रीडा अधिकारी, सांगोला.

# 'शालार्थ आयडी'साठी २९६ शिक्षक वेटिंगवर

सोलापूर : जिल्ह्यातील विनाअनुदानित व टप्पा अनुदानावरील माध्यमिक शाळांमधील २९६ शिक्षकांना अद्याप शालार्थ आयडी मिळालेला नाही. आवक-जावक नोंदवह्या गहाळ झाल्याने हा विषय प्रलंबित राहिला आहे. पोलिस ठाण्यात याप्रकरणी एफआयआर दाखल झाल्याने त्या शिक्षकांना शालार्थ आयडी मिळेल, अशी अशा आहे. पण, त्याअगोदर २२ मुद्द्यांची पडताळणी होणार आहे. त्याशिवाय मान्यता मिळणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी २०, ४० व ६० टक्के अनुदानावरील शाळांना वाढीव २० टक्के अनुदान देण्याचा निर्णय घेतला. त्यातून वर्षानुवर्षे अत्यल्प पगारावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या आशा पल्लवित झाल्या. त्यात सोलापूर जिल्ह्यातील जवळपास साडेतीन हजारांवर शिक्षकांचा समावेश होता.२९६ शिक्षक वगळता उर्वरित शिक्षकांना वाढीव २० टक्क्यानुसार पगारही सुरू झाला. मात्र, शिक्षण खात्यातील आवक-जावक नोंदवह्या, एक-दोन नव्हे तर सात नोंदवह्या गहाळ झाल्याची बाब उघड झाली आणि २९६ शिक्षकांच्या शालार्थ आयडीचे काम अर्ध्यावरच अडकले. त्या शिक्षकांकडे शिक्षणाधिकाऱ्यांची मान्यता आहे, पण मान्यतेसंदर्भातील रेकॉर्ड नाही. आवक-जावक नोंदवह्यांमध्ये या बाबी स्पष्टपणे नमूद असतात, पण त्या वह्याच नसल्याने मोठी पंचाईत झाली आहे.नोंदवह्या गहाळ झाल्याची तक्रार सदर बझार पोलिसांत दाखल झाल्यानंतर त्याची प्रत उपसंचालकांना पाठवून देण्यात आली. आता त्या शिक्षकांना शालार्थ आयडी देण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. परंतु, कधीपर्यंत तो आयडी मिळेल, याबद्दल वरिष्ठ अधिकारी ठामपणे सांगू शकत नाहीत, हे विशेष.शिक्षकांकडे मान्यता आहे, पण त्याचे संपूर्ण रेकॉर्ड माध्यमिक शिक्षण कार्यालयाकडे नाही. त्यामुळे आता शालार्थ आयडी न मिळालेल्या शिक्षकांची नेमणूक त्या शाळांवर कधी झाली, त्यांच्याकडे कोणता वर्ग होता, त्यांच्या मान्यतेवरील शिक्षणाधिकाऱ्यांची स्वाक्षरी खरी आहे का, त्यांनी परीक्षेचे कामकाज पाहिले आहे का, वृत्तपत्रात त्या पदाच्या भरतीसंदर्भात जाहिरात आली होती का, कधी आली होती अशा प्रमुख २२ बाबींची पडताळणी उपसंचालक स्तरावर सुरू आहे. त्यानंतरच संबंधित शिक्षकांना शालार्थ आयडी वितरित केला जाणार आहे.

# ड्रग माफिया ललीत पाटील हे तर एक प्यादे, खरा मास्टरमाईंड कोण? : नाना पटोले

**मुंबई–**महाराष्ट्र एक सुसंस्कृत व प्रगत राज्य असून महाराष्ट्राच्या नावलौकीकाला काळीमा फासण्याचे काम भाजपा सरकार करत आहे. राज्यात मागील काही दिवसांत ड्रग्जचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. एवढा मोठा ड्रग्जचा धंदा राजकीय आशिर्वाद असल्याशिवाय होऊच शकत नाही. ड्रगच्या काळ्या धंद्यातील ललीत पाटील हा एक प्यादा आहे, या प्रकरणातील मास्टरमाईंड कोण? त्याचा शोध लागला पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अद्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.



ड्रग माफिया ललीत पाटीलला मुंबई पोलिसांनी अटक केल्याबद्दल मुंबई पोलिसांचे अभिनंदन करुन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, नाशिकमध्ये ड्रग्जचा मोठा साठा जप्त करण्यात आला होता, त्यानंतर सोलापूरातील एमआयडीसीमध्येही ड्रग्जचा साठा सापडला. महाराष्ट्रात अशा प्रकारे ड्रग्जचे साठे सापडणे हे महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी घटना आहे. या ड्रग प्रकरणातील ललीत पाटील हा पुण्याच्या ससून रुग्णालयात सर्व सोयींचा उपभोग घेत होता हे समोर आले आहे. या ललीत पाटीलला पळवून लावण्यात आल्याचे आम्ही आधीच सांगितले होते. आज आमचे म्हणणे खरे ठरले असून ललीत पाटील स्वतःच सांगत आहे की त्याला पळवून लावण्यात आले होते. या सर्व प्रकरणाचा छडा लागला पाहिजे. ड्रग्जच्या काळ्या धंद्याला कोणाचा आशिर्वाद आहे ? ललीत पाटीलच्या मागे कोणती शक्ती काम करत आहे? हे उघड झाले पाहिजे. भाजपा सरकार तरुणांच्या हाताला काम देत नाही, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे, सरकारी नोकर भरती केली जात नाही, खाजगी कंपन्यांकडून कंत्राटी पद्धतीने पदे भरुन तरुणांची थट्टा केली जात आहे, तर दुसरीकडे तरुणांना ड्रग्जच्या विळख्यात ओढून त्यांना बरबाद करण्याचे पाप भारतीय जनता पक्षाचे सरकार करत आहे. भाजपा सरकारच्या काळात घोटाळेबाज, गुन्हेगार, दरोडेखोर, खुनी, बलात्कारी तसेच ड्रग्जचा काळा धंदा करण्यांना 'अच्छे दिन' आले आहेत. हे सरकार जनतेच्या मुळावर उठले आहे, महाराष्ट्राला बदनाम करणाऱ्या या माफियांचा तसेच त्यांच्यामागच्या शक्तीचा शोध लागला पाहिजे असेही पटोले म्हणाले.

# ग्रामपंचायत निवडणुक चौथ्या दिवशी सदस्यासाठी ३४७ तर सरपंचासाठी ५० अर्ज

**मंगळवेढा–** गावगाड्यातील ग्रामपंचायतचा कारभार ताब्यात घेण्यासाठी इच्छुकांची उमेदवारी दाखल करण्यासाठी तहसील कार्यालयात मोठी गर्दी उसळली.चौथ्या दिवशी सदस्य पदासाठी ३४७ तर सरपंच पदासाठी ५० उमेदवाराचे उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती निवडणूक शाखेचे उमाकांत मोरे यांनी दिली.आज दि.२० अर्ज दाखल करण्याची अंतीम मुदत आहे.सरपंचाच्या थेट निवडीमुळे गाव गाड्यात सदस्य होण्यासाठी अनेकांची नकार घंटा मिळत आहे. मात्र सदस्य पदासाठी उमेदवार निश्चित करण्यासाठी मनधरणी करताना नेत्यांची दमछाक होत आहे. त्यासाठी त्यांना विविध माध्यमांतून आमीष दाखवून तयार केले जात आहे. उमेदवारी अर्ज दाखल करावयाची अंतिम मुदत आज दि. २० ला असल्यामुळे उमेदवारी दाखल अर्ज करण्यासाठी गर्दी होणार आहे.या कार्यालयातील बहुतांश कर्मचारी हे या निवडणुकीसाठी गुंतल्यामुळे ग्रामीण भागातील इतर कामासाठी आलेल्या नागरिकांना देखील त्यांच्या सहीसाठी तहसील कार्यालयात गर्दी करत आहेत. गर्दी कमी करण्यासाठी निवासी नायब तहसीलदार चंद्रकांत हेडगिरे वारंवार स्पीकर वरून सूचना देत होते.ब्रह्मपुरीत या ग्रामपंचायत साठी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. सर्वात जास्त सदस्यपदासाठी उमेदवारी अर्ज रड्डे ग्रामपंचायतीसाठी २४ तर सरपंच पदासाठी आंधळगाव व महमदाबाद हुन्नूर येथे प्रत्येकी सहा अर्ज आज दाखल झाले.गावनिहाय उमेदवारी अर्ज दाखल केलेले पुढील प्रमाणे कंसात सरपंच पदाचे उमेदवार

शिरसी १८ ,आंधळगाव १९(६),खडकी ८(१), अकोला ५(१),जंगलगी २३(४), खुपसंगी १९(२), जुनोनी ८(२),महमदाबाद हु १८(६),बठाण १६(१),शेलेवाडी ११(२), उचेठाण ७(३), निंबोणी १९(२), जालीहाळ ५,मुंढेवाडी ७,भाळवणी १३(१),चिक्कलगी १५(२) ,नंदूर ६(४), हिवरगाव १४(१) ,रड्डे २४(०)लक्ष्मी दहिवडी १९(३),लोणार २२(४),मानेवाडी १, पडोळकरवाडी १३(२) रेवेवाडी ११(१), देगाव १५(३) ,डिकसळ ९ (१) ,बालाजी नगर पोटनिवडणूक २ अर्ज दाखल झाले.

# मराठा तरुणांनो टोकाचे पाऊल उचलू नका:आपले आयुष्य संपवून मराठा आरक्षण मिळणार नाही - अशोक चव्हाण

**मुंबई–**मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी लढा उभारला आहे. राज्य सरकारने या संदर्भात अद्याप कुठलाही ठोस निर्णय घेतलेला नाही. मराठा तरूण टोकाचे पाऊल उचलत आहेत. जालना जिल्ह्यातील एका तरुणाने जरांगे पाटील यांना पत्र लिहून मुंबईत आत्महत्या केल्याचे प्रकरण समोर आले आहे. यावर माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी संताप व्यक्त करत राज्य आणि केंद्र सरकारवर टीका केली आहे.मराठा आरक्षणाच्या आंदोलनात सक्रिय असलेले सुनील कावळे यांच्या आत्महत्येची दुर्दैवी घटना प्रसारमाध्यमांमधून समोर आली आहे. त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. माझी सर्वांना कळकळीची विनंती आहे की, कृपया कोणीही असे टोकाचे पाऊल उचलू नका. आपले आयुष्य संपवून मराठा आरक्षण मिळणार नाही, तर त्यासाठी लोकशाहीच्या मार्गाने लढा द्यावा लागणार आहे. त्यासोबतच माझी केंद्र व राज्य सरकारलाही विनंती आहे की त्यांनी मराठा कार्यकर्त्यांच्या होणाऱ्या आत्महत्यांची गंभीर दखल घ्यावी आणि मराठा आरक्षणाची मागणी पूर्ण करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलावीत.सुनील कावळे (४५ वर्ष) असे आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. मुंबईच्या वांद्रे पूर्वेकडील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील उड्डाणपुलावर



गळफास घेऊन या तरुणाने आत्महत्या केली आहे. सुनील कावळे जालन्याचे रहिवाशी होते. त्यांच्याकडे असलेल्या बॅगमध्ये सुसाईड नोट सापडली आहे . मध्यरात्री त्यांनी आत्महत्या केल्याचे समोर येत आहे. खचून जाऊ नका, लढाई अर्ध्यावर टाकून तर जाऊच नका असे आवाहन विनोद पाटील यांनी केले आहे.आपल्या मागण्या मंजूर करून घेण्याचा आत्महत्या हा योग्य मार्ग नाही. काळाच्या छाताडावर बसून अनेक संग्राम आपल्या या लढवय्या जातीने इतिहासात जिंकले आहेत. खचून जाऊ नका, लढाई अर्ध्यावर टाकून तर जाऊच नका, असे आवाहन विनोद पाटील यांनी केले आहे. मराठा आरक्षणाचा विषय दिवसेंदिवस अधिक गंभीर होत जाणार आहे. मराठा आरक्षण हा विषय आमच्या जगण्याशी संबंधित आहे, हे आता तरी मान्य करा. एवढे बळी गेल्यावरही तुम्हाला जाग येत नाही. यापेक्षा मराठा युवकांच्या आत्महत्या होऊ नये, यासाठी सरकारने तात्काळ पाऊले उचलावी. नाहीतर उद्रेक अटळ आहे.

# ड्रग्ज प्रकरणात कोणाला किती हफ्ते जातायत त्याचा माझ्याकडे कागद : संजय राऊत

**नाशिक–**ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी ड्रग्ज प्रकरणाचा मुद्दा उपस्थित करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री दादा भुसे यांच्यावर टीका केली आहे. ड्रग्ज प्रकरणात कोणाला किती हफ्ते जातायत त्याचा माझ्याकडे कागद असल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे. या प्रकरणात पोलिसांना खुलेआम हफ्ते जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. यात आमदारापासून नांदगावपर्यंत हफ्ते जात असल्याचे ते म्हणाले. या प्रकरणात संजय राऊत यांनी अप्रत्यक्षपणे देवयानी फरांदे आणि सुहास कांदे यांच्यावर निशाणा साधला आहे. उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावरही त्यांनी टीका केली.ललित पाटील यांच्या प्रकरणानंतर संजय राऊत यांच्या नेतृत्त्वात आज नाशिकमध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने मोर्चा काढण्यात येत आहे. त्यासाठी संजय राऊत सध्या नाशिकमध्येच आहेत. त्यांनी येथे पत्रकारांशी संवाद साधता. या दरम्यान त्यांनी नाशिकमधील ड्रग्ज प्रकरणावरुन अनेक प्रश्न उपस्थित केले. सध्या नाशिकमध्ये कोणाच्या संगनमताने किंवा आशीर्वादाने सर्व सुरू आहे ? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला आहे. नाशिक ते मालेगावपर्यंत फक्त ड्रग्जचा व्यापार आणि त्यातून आर्थिक उलाढाल केली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणात कोणालाही सोडणार नाही, असे पालकमंत्री दादा भुसे सांगत आहेत. मात्र, कोणाला सोडणार नाही म्हणजे काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यात तुमचे हफ्तेबाज आहेत त्यांना का सोडलंय ? असा प्रश्नही त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

# तिसंगी तलाव ताबडतोब भरुन घ्यावा-डा.भाई बाबासाहेब देशमुख




**सांगोला । प्रतिनिधी**

सध्या पाऊस काळ कमी झाल्याने शेतकरी अतिशय अडचणीत आलेला आहे.उभे पिके जळुन जाण्याच्या मार्गावर आहेतच..आशा वेळी निदान जनावरांच्या व पिण्याच्या पाण्यासाठी तरी पाणी सोडण्यात यावे व तिसंगी तलाव ताबडतोब भरुन घेण्यात यावा अशी मागणी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे..तिसंगी तलाव भरुन घ्यावा या मागणीसाठी काही शेतकरी उपोषणास बसले आहेत त्यामध्ये प्रामुख्याने शेतकरी नेते समाधान फाटे हे आमरण उपोषणाला बसले असुन त्या उपोषणाची दखल घेऊन अधिकाऱ्यांनी योग्य तो मार्ग काढुन तिसंगी तलाव ताबडतोब भरुन घेण्यात यावा .. प्रत्येक वर्षी तिसंगी तलावता पाणी सोडण्यात यावे या मागणीसाठी जर शेतकऱ्यांना आंदोलन करावे लागत असेल तर ते अयोग्य असल्याचे डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरुन बोलले.येणाऱ्या काळात या लाभधारक शेतकऱ्यांच्या पिकासाठी पाण्याचे योग्य ते नियोजन करावे या बाबत सविस्तर चर्चा केली.तसेच पंढरपूर तालुक्याचे युवा नेते मा.समाधान काळे यांनी ही अधिकाऱ्यांना फोन करुन पाणी सोडण्यात यावी अशी मागणी केली..अधिकाऱ्यांनी येणाऱ्या काळात शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगीतले...,सदर प्रसंगी भारत नाना कोळेकर यांच्या सहित लाभक्षेत्रातील अनेक शेतकरी उपस्थितीत असल्याची माहिती प्रसिध्दी प्रमुख भाई चंद्रकांत सरतापे यांनी दिली

# सोलापुरात पुन्हा सहा कोटींचे ड्रग्ज पकडले; दोघांना अटक

## सोलापूर, पुणे, मुंबई असे ड्रग कनेक्शन?

**सोलापूर–**सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मोठी मंगळवारीरात्री कारवाई करत ६ कोटींचे ड्रग्ज (अंमलीपदार्थ) विक्रीसाठी नेताना पकडले. दोनच दिवसानंतर ही मोठी कारवाई करून ड्रग पकडल्यामुळे सोलापूर, पुणे, मुंबई असे ड्रग कनेक्शन आहे काय या दृष्टीने पोलिसांनीतपास सुरू केला आहे. मुंबई पोलिसांनीआजच पुण्यातील ड्रग तस्कराला जेरबंदकरून मुंबईत आणले आहे. देवडी येथीलकारवाईत अटक केलेल्या दत्तात्रय लक्ष्मणघोडके, गणेश उत्तम घोडके (औंढी, ता.मोहोळ) या दोघांना मोहोळ न्यायालयानेपोलिस कोठडी सुनावली.मुंबई, पुणे, सोलापूर शहरात सध्या ड्रग्जच्या(अंमली पदार्थ) मोठया कारवाया सुरु आहेत.दोन दिवसांपूर्वी मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनीचिंचोली एमआयडीसी परिसरातील बंदकारखान्यातून ड्रगचा (ड्रगसाठी लागणाराकच्चा माल) साठी पकडला होता. मंगळवारीपुन्हा सोलापूर ग्रामीण पोलिसांनी मोहोळ देवडीफाट्याजवळ कारवाई केली आहे. चारचाकीवाहनातून दोघेजण सहा कोटीचे ड्रग ( अंदाजेतीन ते चार किलो) विक्रीसाठी घेऊन जाणारअसल्याची माहिती पोलिस अधीक्षक यांनामिळाली होती.त्यानुसार काही पथकेकारवाईसाठी मंगळवारपासून तयार केले होते.रात्रीच देवडी फाट्याजवळ सापळा रचूनदोघांना वाहनातून जाताना



पकडले आहे.बुधवारी सकाळी दोघा संशयित आरोपींनामोहोळ न्यायालयात हजर केल्यानंतर २३ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी मिळालीआहे. दत्तात्रय लक्ष्मण घोडके, गणेश उत्तमघोडके (औंढी, मोहोळ) या दोघांना अटकझाल्याची माहिती पोलिस अधीक्षक शिरीषसरदेशपांडे यांनी दिली. दरम्यान, राज्यातअसलेल्या ड्रग्ज कनेक्शनची चौकशी सध्यापोलिस करत असल्याचे पोलिस दलातीलसूत्रांनी सांगितले.

सह्याद्रीचा राखणदार



# साई वर्धा पावर च्या वतीने क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप



**वरोरा । प्रतिनिधी**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या राष्ट्रीय धोरणात्मक योजना अंतर्गत २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त भारत हे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून त्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने समाजातील विविध स्तरावर काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, सी.एस. आर यांच्या सोबत समन्वय साधून टी बी रुग्णांना मदतीची आवश्यकता आहे. कम्युनिटी सपोर्ट टू टीबी पेशंट च्या माध्यमाने प्रधानमंत्री टी बी मुक्त भारत अभियान हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत . साई वर्धा पावर जनरेशन प्रा ली. यांनी वरोरा तालुक्यातील १० क्षय रूग्णांना दत्तक घेऊन पोषण आहार किट चे वाटप उपजिल्हा रुग्णालय, वरोरा येथे करण्यात आले.

सदर कार्यक्रमास अध्यक्ष स्थानी डॉ प्रफुल खुजे हे होते त्यांनी वरोरा तालुक्यातील क्षयरोगाचे प्रमाण तसेच त्याचा निर्मूलन करिता ए सी एफ कार्यक्रम व आहाराचं महत्व यावर भाष्य करतांना समाजाचे या उपक्रमातील महत्व व योगदान यावर प्रकाश टाकला. साई वर्धा कंपनी चे अधिकारी के व्ही कृष्णा किशोर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सामाजीक बांधिलकी पाळत कंपनी सदा मदत करण्याचे आश्वासन दिले . सी एस आर विभागाचे नरेन्द्र निब्रड, किरण बैस, यांची उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक उमाकांत जावादे यांनी केले तर कार्यक्रमाचे संचालन गोविंद कुंभारे (समुपदेशक) यांनी केले. समारोप प्रियांका रॉय यांनी उपस्थितांचे आभार मानून केले.

# रंगधामपेठा येथील कोनम कुटुंबाला राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्याकडून आर्थिक मदत



**सिरोंचा । प्रतिनिधी**

तालुक्यातील ग्रामपंचायत रंगधामपेठा येथील भाजपा कार्यकर्ते लक्ष्मीनारायण कोनम यांच्या पत्नीचे १७ ऑक्टोंबर रोजी रंगधामपेठा येथे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.विशेष म्हणजे त्यांचा धाकटा मुलगा रामेश्वर वय १९ याचा रविवारी ८ ऑक्टोंबर ला सायंकाळी कालेश्वर येथे गोदावरी नदीच्या पात्रात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला होता.त्या दुःखातून सावरत नाही तोच पत्नीलाही मृत्यूने गाठल्यामुळे त्यांच्यावर आघात झाला आहे.याबाबत माहिती मिळताच माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी तातडीने आर्थिक मदत आपल्या कार्यकर्त्यांद्वारे पोहोचविली. यावेळी शंकर नरहरी,चंद्रय्या सदनपू,श्रीनाथ राऊत,माधव कासर्लावार,सितापती गट्टू, मुरलीधर राचावर, श्रीनिवास कोठारी,संजीव जोडे, श्रीनिवास चौधरी, हरीश कोतावडला,मनोज मोलगुरी,पार्वतालु देनाबोईना, महेश कारकरी आदी उपस्थित होते.




सरस्वती शारदा मंडळ, सरस्वती नगर (विजासन), भद्रावती जिल्हा चंद्रपूर



दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे मुख्य संपादक तथा प्रकाशक मारोती घुमे यांचा मराठी दुर्गा उत्सव मंडळ वरोरा तर्फे सत्कार करण्यात आला . सत्कार करतांना मराठी दुर्गा उत्सव मंडळ वरोरा चे अध्यक्ष मुकेश जिवतोडे



शिवसेना (उ.बा.ठा) चंद्रपूर जिल्हा प्रमुख मुकेश जीवतोडे यांनी सहपरिवार घेतले दुर्गा मातेचे दर्शन



मराठी दुर्गा उत्सव मंडळ वरोरा

# जिवती तालुक्यात लिडकॉम आपल्या दारी कार्यक्रम

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, चंद्रपूरच्या वतीने जिवती तालुक्यातील चिखली व मोहदा येथे लिडकॉम आपल्या दारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाला महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक कल्पना भंगाळे यांच्यासह पांडुरंग कांबळे, सतिश कांबळे, सुग्रीव सुरनर, मधुकर येरेवाड, मालोजी वाघमारे तसेच मोठ्या संख्येने चर्मकार बांधव उपस्थित होते.शासन आपल्या दारी या संकल्पनेतून महामंडळातर्फे लिडकॉम आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष असून जास्तीत जास्त चर्मकार बांधवांपर्यंत महामंडळाच्या योजना पोहोचाव्यात या उद्देशाने, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांच्या मार्गदर्शनानुसार लिडकॉम आपल्या दारी या मेळावा कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर होत आहे.चिखली व मोहदा येथे झालेल्या मेळाव्याला महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक कल्पना भंगाळे यांनी उपस्थित चर्मकार बांधवांना मार्गदर्शन केले. त्यांनी महामंडळाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित बांधवांना दिली. सोबतच चर्मकार समाज व्यवसायात येऊन चर्मकार समाजातून यशस्वी व्यावसायिक घडावेत यासाठी महामंडळ नेहमी प्रयत्नशील आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.तसेच चर्मकार बांधवानी पारंपारीक व्यवसायासोबतच काळाच्या गरजेनुसार इतरही नवीन व्यवसाय करावे आणि व्यवसायासाठी लागणारे भांडवल संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाद्वारे दिल्या जाईल. असे सुरज दहागांवकर यांनी प्रास्ताविकेतून स्पष्ट केले.

# प्रधानमंत्री आवास योजनेचे ग्रामपंचायत कोसरसार ला मिळाले दुसरे पारितोषिक

**वरोरा । प्रतिनिधी.**

प्रधानमंत्री आवास घरकुल योजना २०२२-२३ या वर्षांमध्ये तालुक्यातील ज्या ग्रामपंचायत ला प्रधानमंत्री आवाज योजने अंतर्गत ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले अश्या लाभार्थ्यांना ९० दिवसात घराचे बांधकाम करण्यासाठी शासनाकडून वेळ देण्यात आला होता अश्या लाभार्थ्यांनी सदर घरकुलाचे काम मुदतीत पूर्ण केल्याबद्दल दुसरे पारितोषिक हे ग्रामपंचायत कोसरसार ला देण्यात आले.

हे पारितोषिक वरोरा भद्रावती निर्वाचन क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर व पंचायत समिती वरोरा येथील गटविकास अधिकारी संदीप गोडशवार यांच्या हस्ते



ग्रामपंचायत सरपंच गणेश मडावी व सचिव सुखदेव कवळकार यांना प्रदान करण्यात आले.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ.पी.पी.वावा यांचा चंद्रपूर जिल्हा दौरा

**चंद्रपूर**–राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे (नवी दिल्ली) सदस्य डॉ. पी.पी.वावा हे चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

शनिवार, दि.२१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वा. महानगरपालिका सभागृह, चंद्रपूर येथे सफाई कर्मचारी यांच्याशी संबधित विविध विषयावर अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक. तसेच दुपारी ४ वा. जिल्हा नियोजन कार्यालय सभागृह येथे सफाई कर्मचारी यांच्याशी संबंधित विविध विषयावर अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतील. रात्री चंद्रपूर येथे मुक्काम. रविवार, दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता नागपूरकडे प्रयाण.

# मान्यताप्राप्त २११ मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरणाच्या प्रस्तावाची यादी प्रसिद्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

१ जानेवारी २०२४ या अहर्ता दिनांकावर आधारीत छायाचित्रासह मतदार याद्यांचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने, पूर्व पुनरीक्षण उपक्रमाचा एक भाग म्हणून,भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २२ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर २०२३ या कालावधीत जिल्ह्यातील मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.


त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघामध्ये मिळून एकत्रितरीत्या मतदान केंद्राच्या नावातील बदलाचे १३७, मतदान केंद्राच्या स्थानातील बदलाचे ५४ तसेच मर्ज करण्यात आलेल्या ९ मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एका मतदान केंद्रावरील १५०० मतदारापेक्षा अधिक क्षमता होणाऱ्या मतदान केंद्राच्या



बाबतीत नव्याने प्रस्तावित होणारे ११ मतदान केंद्र असे एकूण २११ मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण व पुनर्रचनेचे प्रस्ताव ३ ऑक्टोबर २०२३ रोजी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फतीने भारत निवडणूक आयोगास सादर करण्यात आले. सदर २११ मतदान केंद्राचे सुसूत्रीकरणाच्या प्रस्तावास भारत निवडणूक आयोगाने १८ ऑक्टोबर २०२३ रोजी मान्यता दिली असल्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे. तरी सदर मान्यताप्राप्त २११ मतदान केंद्राच्या सुसूत्रीकरणाच्या प्रस्तावाची यादी १९ ऑक्टोबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येत आहे, असे उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

# ललित पाटील पीसीआर काळात १४ दिवस ससूनमध्ये हे सर्व कोणाच्या आर्शीवादाने झाले? देवेंद्र फडणवीस

**मुंबई**–ललित पाटील याला अटक झाली तेव्हा ते उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नाशिक जिल्ह्याचे प्रमुख होते. त्यांना अटक झाल्यानंतर त्यांना १४ दिवसांचा पीसीआर मिळाला. मात्र, या सर्व १४ दिवसांच्या काळात ललित पाटील ससून रुग्णालयात भरती होते. यामुळे हे सर्व कोणाच्या आर्शीवादाने झाले? असा गंभीर प्रश्न उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणाला तत्कालिन मुख्यमंत्री की गृहमंत्री जबाबदार आहेत? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.ललित पाटील प्रकरणात आपण अनेक मोठे खुलासे करणार असल्याची माहिती देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या प्रकरणात त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. १४ दिवसांच्या पोलिस रिमांडमध्ये असताना ललित पाटीलला पूर्ण वेळ



रुग्णालयात का ठेवण्यात आले? इतकेच नाही तर त्याची चौकशी पूर्ण झाली नाही, तरी देखील पोलिस कोठडीत वाढ करण्याचा अर्ज पोलिसांनी का केला नाही? असे अनेक प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केले आहेत.नाशिकमध्ये तब्बल ३२६ कोटींचा मेफेड्रीन (एमडी ड्रग्ज) तयार करणारा कारखाना उद्ध्वस्त झाल्याच्या घटनेने राज्यात प्रचंड खळबळ उडाली. त्याचा उद्गाता आणि एमडीचे राज्यभरात नेटवर्क तयार करणारा मुख्य सूत्रधार म्हणून ललित अनिल पाटील याचे नाव पुढे आले होते. ललित पाटील ससून रुग्णालयातून फरार झाल्यानंतर त्याला १६ दिवसांनंतर मुंबई पोलिसांपनी अटक केली आहे. त्यामुळे त्याच्या कृष्णकृत्यांचा पाढाच वाचला जात आहे. राजकीय नेतेमंडळींच्या आशीर्वादाने आणि पोलिस यंत्रणेतील कमकुवत धागे पकडत ड्रग्जचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क बनविणाऱ्या पाटीलचा राजकीय कार्यकर्ता ते ड्रग्जमाफिया हा प्रवास आहे. या प्रकरणावरुन सरकार विरुद्ध विरोधक असा सामना सध्या राज्यात पाहायला मिळत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .